महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ १२ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १६७ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

## आजची गावकुसे समस्या ग्रस्त का?

गावकुस ही केवळ भौगोलिक सीमा नसते, तर ती एक संस्कृती, एक परंपरा आणि एकात्मतेची ओळख असते. मात्र अलीकडच्या काळात अनेक गावकुस समस्या-ग्रस्त होताना दिसतात. शासनाचे नियोजन, स्थानिक स्वराज्य संस्थांची निष्क्रियता आणि वाढलेले सामाजिक-आर्थिक ताण यामुळे गावकुस आज एका मोठ्या संकटातून जात आहे.

**१) अनियोजित वाढ आणि जमीन वाटपातील गोंधळ**

गाव विस्ताराचा वेग वाढला, पण त्याला अनुरूप नियोजन झाले नाही. जागेची विभागणी, बांधकामाचे नियम, आराखडे—यातील स्पष्टतेअभावी वाद वाढले. ग्रामपंचायतींना तांत्रिक मार्गदर्शन न मिळाल्याने अनधिकृत बांधकामे, अरुंद रस्ते आणि अस्वच्छ वस्ती तयार झाली.

**२) पायाभूत सुविधांची दयनीय अवस्था**

पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, रस्ते, सार्वजनिक जागा—या सगळ्यांचा दर्जा घसरला आहे. विहिरी सुकल्या, पाणी पुरवठा अनियमित झाला, तर सांडपाण्याची गटारव्यवस्था कोलमडली. रस्त्यांवरील खड्डे, पावसाळ्यातील चिखल, तसेच दिवाबत्तींची कमतरता ग्रामस्थांच्या दैनंदिन जीवनाला त्रासदायक बनवते.

**३) शासनाच्या योजना कागदावर, अंमलबजावणी कमकुवत**

शासन विविध योजना जाहीर करते; परंतु प्रत्यक्ष अंमलबजावणीत लक्ष कमी. निधी वेळेवर न मिळणे, ठेकेदारी पद्धतीतील अनियमितता, पाठपुराव्याचा अभाव—यामुळे कोणत्याही कामाला गती मिळत नाही. स्थानिक नेतृत्वातही नियोजनात्मक दृष्टी कमी असल्याने गावकुस अडचणीत अडकतो.

**४) पर्यावरणीय हानी आणि वाढता प्रदूषण ताण**

ओढे–नाले अतिक्रमणामुळे बंद झाले; कचरा व्यवस्थापनाचे नियोजन नसल्याने गावात दुर्गंधी व आजार वाढले. पाण्याचे स्रोत प्रदूषित होणे, वृक्षतोड, मोकळ्या जागांची नासधूस—या गोष्टी गावकुस अस्वच्छ आणि असुरक्षित बनवतात.

**५) सामाजिक एकजुटीचा अभाव**

एकेकाळी गावातील सर्वजण एकत्र चर्चा करून निर्णय घेत असत. पण आता गटबाजी, राजकीय हस्तक्षेप आणि वैयक्तिक मतभेद वाढल्याने सामुदायिक निर्णयप्रक्रिया ढासळली आहे. जनसहभाग कमी झाल्याने कोणतीही समस्या सोडवणे अवघड होते.

**६) रोजगारांची टंचाई आणि स्थलांतर**

तरुणांना रोजगार उपलब्ध नसल्यामुळे ते शहरांकडे वळतात. लोकसंख्या कमी झाल्याने शेती, ग्रामव्यवस्था आणि स्थानिक बाजारपेठा कमकुवत होतात. गावकुसाची आर्थिक चक्रे मंदावतात.

**उपायांची दिशा**

- पारदर्शक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम गावविकास आराखडा तयार करणे
- सांडपाणी, कचरा व्यवस्थापन आणि पाणीपुरवठा यासाठी स्वतंत्र तांत्रिक समित्या
- ग्रामसभा नियमित व प्रभावी बनवणे
- स्थानिकांना विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेणे
- पर्यावरण संवर्धनावर भर देणे
- नालेसफाई, वृक्षारोपण, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन
- तरुणांसाठी स्थानिक रोजगार निर्मिती उपक्रम

**निष्कर्ष :**

गावकुस समस्या-ग्रस्त हा आजचा वास्तव आहे; मात्र यावर उपायही तितकेच स्पष्ट आहेत. शासन, स्थानिक स्वराज्य संस्था आणि ग्रामस्थ यांनी एकत्र येऊन नियोजनपूर्वक काम केल्यास गावकुस पुन्हा स्वच्छ, सुबक आणि विकसित होऊ शकतो—यात शंका नाही.




## पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी राज्याची केंद्राकडे २९ हजार कोटींची मागणी



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

राज्यातल्या अवकाळी पाऊस आणि पूरग्रस्त शेतकऱ्यांसाठी केंद्राकडे २९ हजार कोटी रुपयांची मदत मागितली आहे. राज्य सरकारनं आतापर्यंत ४४ हजार कोटी रुपये दिले आहेत, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिली. केंद्राची मदत लवकरच मिळण्याची आशा असून दुसरं पाहणी पथक येत्या आठवड्यात येण्याची शक्यता असल्याचं ते म्हणाले. पुरवमी मागण्यांवरच्या चर्चेला ते उत्तर देत होते. यानंतर सुमारे 75 हजार कोटींच्या पुरवणी मागण्या विधानसभेत मंजूर झाल्या. राज्यात वित्तीय शिस्त ठेवण्याचा, उत्पन्नाचे स्त्रोत वाढवण्याचा, राजकोषीय तूट ३ टक्क्यांच्या आत ठेवण्याचा प्रयत्न सुरू आहे असंही ते म्हणाले. महाराष्ट्रासह केवळ ३ राज्यांना कर्जाचं प्रमाण २० टक्क्यांच्या आत ठेवण्यात यश आल्याची माहिती त्यांनी दिली.

## नवी मुंबईत समाविष्ट १४ गावे अद्यापही विकासाच्या प्रतीक्षेत

### कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांची विधानसभेत लक्षवेधी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली** : नवी मुंबई महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या १४ गावांचा पायाभूत विकास अद्याप कागदोपत्रीच अडकलेला असून, नागरिकांना आजही मूलभूत सुविधांसाठी हाल सहन करावे लागत आहेत. रस्ते, विद्युत दिवे, भुयारी गटारे, शाळा, आरोग्य केंद्रे, तलाव, स्मशानभूमी यांसारख्या अत्यावश्यक सुविधांचा या गावांमध्ये अभाव आहे. प्रशासनाकडून नियोजनाच्या आश्वासनांची मालिका सुरू असली, तरी प्रत्यक्ष कामांच्या गतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संताप वाढत असून, तक्रारींना ऊत आला आहे.

कल्याण ग्रामीण विधानसभा क्षेत्रातील या १४ गावांसह जवळपास २७ गावांचा आडीवली-ढोकळी परिसर विकासाच्या प्रतीक्षेत आहे. निधीअभावी रस्ते, मेट्रो प्रकल्प, जलनिस्सारण, सार्वजनिक सुविधांसह मोठ्या प्रमाणात कामे ठप्प झाल्याचे चित्र आहे. या मुद्द्यावर हिवाळी अधिवेशनात कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांनी ठोस भूमिकेतून आवाज उठवत राज्य सरकारचे लक्ष वेधले. निधीची उपलब्धता झाल्यास संपूर्ण परिसराचा पायाभूत विकास गतिमान होईल, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पुढाकारातून कल्याण ग्रामीण मतदारसंघात अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प वेगाने सुरू आहेत. मेट्रो, रस्ते, जलपुरवठा योजना, गटारे, सार्वजनिक सोयी यांसारखी कामे युद्धपातळीवर सुरू असली तरी नव्या १४ गावांच्या समावेशानंतर निधीची आवश्यकता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. राज्य शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून दिल्यास प्रलंबित कामे पूर्ण क्षमतेने पूर्ण होऊ शकतात, अशी अधिवेशनात आमदार मोरे यांनी मागणी ठळकपणे मांडली.

## जिल्हा तांत्रिक सेवा (लेखा) संवर्गातील तिन्ही अधिकाऱ्यांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेत पदोन्नती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा तांत्रिक सेवा, वर्ग–३ (लेखा) संवर्गातील अधिकाऱ्यांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, लेखा अधिकारी, गट-ब (राजपत्रित) या उच्च पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. पदोन्नतीनंतर संबंधित अधिकाऱ्यांना लेखा अधिकारी या जबाबदारीचे पद मिळणार असून, त्यांच्या सेवेत एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभाग वाटप नियम, २०२१ मधील तरतुदीनुसार खालीलप्रमाणे महसूल विभागानुसार पदस्थापना करण्यात आली आहे:

पदोन्नत अधिकारी व पदस्थापना

**१) नारायण सुरपा गावित**

- महसूल विभाग : कोकण–२
- पदस्थापना : लेखा अधिकारी, प्रादेशिक दुग्ध विकास अधिकारी, मुंबई (कोकण) विभाग, नवी मुंबई

**२) पांडुरंग कृष्णाजी कोरडे**

- महसूल विभाग : कोकण–१
- पदस्थापना : लेखा अधिकारी, जल जीवन मिशन, पालघर

**३) संतोष रघुनाथ वंजारी**

- महसूल विभाग : कोकण–२
- पदस्थापना : लेखा अधिकारी, मानवी विकासासाठी उपयोजित ज्ञान आणि कौशल्याचा विकास – दक्ष प्रकल्प, मुंबई

जिल्हा परिषद, ठाणे तर्फे तिन्ही अधिकाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण कामगिरीचा, प्रामाणिक सेवेचा आणि आर्थिक शिस्तीच्या कामकाजातील योगदानाचा सन्मान म्हणून ही पदोन्नती देण्यात आली असल्याचे जिल्हा प्रशासनातर्फे सांगण्यात आले.

या पदोन्नतीमुळे संबंधित अधिकारी अधिक व्यापक कार्यक्षेत्रात, राज्याच्या वित्तीय व्यवस्थापनात आणि योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत महत्त्वाची जबाबदारी निभावतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

जिल्हा परिषद, ठाणे यांनी तिन्ही अधिकाऱ्यांना त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा देत, नव्या पदावर काम करताना त्यांनी संस्थेची प्रतिष्ठा अधिक वृद्धिंगत करावी, अशा शुभेच्छा मुख्य लेखा व वित्त अधिकारी वैजनाथ बुरडकर यांनी दिल्या आहेत.

## बिबट्यांचे हल्ले रोखण्यासाठी कायद्यात सुधारणा करा - खा. नरेश म्हस्के



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात बिबट्यांनी ग्रामीण भागाबरोबरच शहरी भागातही धुमाकूळ घातला आहे. बिबट्याच्या हल्ल्यात अनेकांना प्राणाला मुकावे लागले असून काही जण जखमी झाले आहेत. त्यामुळे बिबट्यापासून बचाव करण्यासाठी विशेष उपाययोजना आखाव्या लागणार आहेत. परंतू, भारतीय वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ च्या कायद्यामुळे बिबट्यांविरोधात वन विभागाला ठोस पावले उचलता येत नाही. त्यामुळे या कायद्यात सुधारणा करून सूची १ मधून बिबट्याला वगळण्यात यावे, अशी आग्रही मागणी खासदार नरेश म्हस्के यांनी संसदेत केली.

खासदार नरेश म्हस्के यांनी संसदेत नियम ३७७ च्या अनुषंगाने महाराष्ट्रात धुमाकूळ घालत असलेल्या बिबट्यांचा विषय संसदेत उपस्थित केला. महाराष्ट्रातील नाशिक, बीड, नागपूर, पुणे, पालघर, रायगड आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांमध्ये मानव-बिबट्या संघर्षाच्या गंभीर समस्येकडे खासदार नरेश म्हस्के यांनी केंद्र सरकारचे लक्ष वेधले. बिबटे सध्या मनुष्यवस्तीत येऊन हल्ले करत आहेत. महिला, लहान मुलांना गळयात काटेरी गोफ घालून फिरावे लागत आहे.

१९७२ च्या भारतीय वन्यजीव संरक्षण अधिनियमात सूची १ मध्ये बिबट्याचा समावेश आहे. या नियमानुसार बिबट्याला गोळी घालू शकत नाही, त्यांना इजा करू शकत नाही. जर असे केल्यास ३ ते ७ वर्ष तुरुंगवास आणि दंडाची कडक शिक्षा आहे. या कायद्याची वन अधिकाऱ्यांना धास्ती असते. मात्र, आता नागरिकांच्या जीवावर हे बिबटे उठले आहेत. गेल्या दोन महिन्यांत जुन्नर आणि शिरूर भागात बिबट्याच्या हल्ल्यांमुळे १४ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. जो वन्यजीव संरक्षण आणि मानवी सुरक्षेमधील गंभीर असमतोल अधोरेखित करतो.राज्यातील ऊसाच्या क्षेत्रात अंदाजे २ हजार बिबटे वास्तव्यास आहेत. आणि अनियोजित विस्तारामुळे ते मानवी वस्त्यांमध्ये वाढत्या प्रमाणात प्रवेश करत आहेत. हा संघर्ष केवळ स्थानिक समस्या नाही तर, अनियंत्रित विकासामुळे एक राष्ट्रीय आव्हान आहे. या मानवतावादी संकटाचे त्वरित निराकरण करणे आवश्यक असल्याची गंभीर बाब, खासदार नरेश म्हस्के यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली.

## जीवनदीप महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची लोकमत माध्यम समूहाला अभ्यास भेट



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**गोवेली** : शैक्षणिक जीवनात अभ्यास भेट हा एक विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाचा एक भाग पाहायला मिळतो. अशाच रीतीने माध्यम क्षेत्रात शिक्षण घेत असलेले विद्यार्थी यांना विविध वृत्तपत्र कार्यालय तसेच न्यूज चैनल अशा ठिकाणांना भेटी देऊन तेथील कामकाज दाखविण्यात येते व यामुळे विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मार्गदर्शन देखील मिळते .अशाच प्रकारे जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथील पत्रकारिता विभागाच्या विद्यार्थ्यांची अभ्यास भेट ही बुधवार दिनांक १०-१२- २०२५ रोजी न्यूज १८ लोकमत माध्यम समूहाला देण्यात आली. २४ विद्यार्थी व ४ प्राध्यापक हे अभ्यास भेटी दरम्यान उपस्थित होते. न्यूज १८ लोकमतचे संपादक: मंदार फणसे, तसेच स्टार अँकर: विलास बडे, व्हिडिओ एडिटर;शंकर कांबळे , असोसिएट एडिटर सुनील सर यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांनी या क्षेत्रात येत असताना अतिशय आवडीने प्रवेश करावा फक्त नोकरीच्या उद्देशाने येणे टाळावे असे उद्देशून सांगितले व आपल्या कार्यातून समाजात आपण बदल घडवू शकतो ही खुणगाठ आपण बाळगली पाहिजे हे देखील ध्यानात ठेवा असे मार्गदर्शन केले. कॅमेरा रूम, प्रोडक्शन रूम, पी सी आर, तसेच संगणकावरील विविध कामे हे विद्यार्थ्यांना ह्या अभ्यास भेटी दरम्यान जवळून पाहता आली. सदर अभ्यास भेटी दरम्यान मास मीडिया विभाग प्रमुख. डॉ. राहुल तौर, प्रा. जया देशमुख, प्रा. मोहन गारे, प्रा. निलेश कुंभार हे उपस्थित होते. सदर अभ्यास भेटीला महाविद्यालयाचे अध्यक्ष. रविंद्र घोडविंदे, संचालक: प्रशांत घोडविंदे, प्राचार्य. डॉ.अशोक वाघ, उपप्राचार्य.हरेंद्र सोष्टे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले विद्यार्थी प्राध्यापक यांच्या एकत्रित सहभागाने सदर अभ्यास भेट यशस्वीरित्या संपन्न झाली.

## उल्हासनगरात रक्तरंजित राडा

## कलानी समर्थकावर हल्ला ■ मंदिर परिसरात खळबळ




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर** : उल्हासनगर कॅम्प २ मधील ढोलूराम मंदिर परिसरात टीम ओमी कलानीच्या कट्टर समर्थकावर झालेल्या चाकू हल्ल्याने शहरात खळबळ उडाली आहे. केवळ गाडीचा कट लागल्याच्या किरकोळ कारणावरून वाद पेटला आणि पाहता पाहता रक्तरंजित हल्ल्यापर्यंत पोहोचल्याने नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

उल्हासनगर कॅम्प २ मधील ढोलूराम मंदिर परिसरात टीम ओमी कलानीचे कट्टर समर्थक जयकिशन आलमचंदानी उर्फ जॅकी यांच्यावर झालेल्या चाकू हल्ल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 'कारचा कट लागल्यापासून सुरू झालेला वाद' क्षणात रौद्ररूप धारण करत हल्ल्यात परिवर्तित झाला. दुपारी साडेचारच्या सुमारास आलमचंदानी हे ढोलूराम दरबार परिसरातून आपल्या बर्गमन मोटरसायकलवरून जात होते. याच वेळी समोरून आलेल्या कारमधून दोन व्यक्ती उतरले आणि मोटरसायकलला कट मारल्याच्या कारणावरून त्यांच्यात वाद सुरू झाला. अल्पावधीतच वाद हातघाईपर्यंत पोहोचला.

ओमी कलानीचे कट्टर समर्थक जयकिशन आलमचंदानी उर्फ जॅकी यांच्यावर झालेल्या चाकू हल्ल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. कारमधील एका व्यक्तीने जवळील धारदार शस्त्र काढत आलमचंदानी यांच्यावर चाकूने हल्ला चढवला. पोटावर दोन आणि पाठीवर एक असा एकूण तीन वार झाल्याने ते जखमी झाले. नागरिकांच्या मदतीने त्यांना तातडीने शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात दाखल करण्यात आले होते, मात्र त्यांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

**तानाजीनगरात मारहाण; हल्लेखोराला अटक**

दुसरीकडे, उल्हासनगर कॅम्प ५ मधील तानाजी नगरात सराईत गुंडांनी केलेल्या हल्ल्याने परिसरातील नागरिक दहशतीखाली होते. मात्र हिललाईन पोलिसांनी रचलेल्या सापळ्यात अखेर मुख्य आरोपी अडकला आहे. उल्हासनगरातील तानाजीनगर परिसरात घडलेल्या धक्कादायक हल्ल्याने उल्हासनगर पुन्हा हादरले आहे.

## भंगारातून शासकीय तिजोरीत अवरतली धनलक्ष्मी

### ५६५ पोलिस गाड्यांच्या लिलावातून पावणेदोन कोटी जमा



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : वर्षभरात ठाणे शहर पोलिस दलातील ५६५ कालमर्यादा संपुष्टात आलेल्या पोलिस गाड्यांचा लिलाव यशस्वी पार पडला आहे. त्या गाड्यांच्या लिलावातून शासकीय तिजोरीत अक्षरशः धनलक्ष्मी अवतरल्याचे दिसत आहे. या लिलावामुळे सरकारकडे पावणेदोन कोटींहून अधिक रुपये जमा झालेले आहेत, तर येत्या आठवड्यात आणखी २१ गाड्यांचा लिलाव होणार असल्याची माहिती ठाणे शहर पोलिस दलातील मोटार परिवहन विभागाने दिली. प्रत्येक वाहनाची एक विशिष्ट कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे. ही कालमर्यादा साधारणपणे १५ वर्षे असते. त्यानंतर त्या गाड्या भंगारात निकाली काढल्या जातात. अशाप्रकारे पोलिस दलात दाखल झाल्यानंतर २०१६ पासून २०२३ या कालावधीत कालमर्यादा संपुष्टात आलेल्या गाड्यांचा लिलाव केंद्र सरकारच्या एमएसटीसीमार्फत ऑनलाइन करण्यात येतो. त्यानुसार यावर्षी आतापर्यंत ५६५ गाड्यांचा लिलाव झाला असून, यामध्ये सर्वाधिक ३७८ मोटारसायकल आणि १९८ चारचाकी गाड्यांचा समावेश आहे. नियमानुसार तीन ते चार वेळा पार पडलेल्या लिलावातून सरकारला त्या गाड्यांच्या लिलावपोटी एक कोटी ७६ लाख नऊ हजार ९५३ रुपये मिळाले आहेत. दरम्यान, या वर्षातील उर्वरित २१ गाड्यांचा पुढील आठवड्यात ऑनलाइन लिलाव आयोजित केला आहे.

# विशेष मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार्य करणार




## : जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : विशेष मुलांना स्वावलंबी करण्यासाठी तसेच त्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी जे जे सहकार्य लागेल ते करण्यासाठी जिल्हा प्रशासन कायमच पाठीशी राहील. तसेच या मुलांच्या सर्वांगीण विकासाठी ज्या योजना असतील त्या योजनांचा लाभ या विद्यार्थ्यांना मिळावा यासाठी नेहमीच सहकार्य राहील असे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जागतिक दिव्यांगदिनी नमूद केले.ठाणे महानगरपालिकेच्यावतीने जागतिक दिव्यांग दिनाचे आयोजन आज राम गणेश गडकरी रंगायतन येथे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, उपायुक्त उमेश बिरारी, दिव्यांग कला प्रतिष्ठानचे किरण नात्ति आदी उपस्थित होते.

दिव्यांग मुलांच्या कलागुणांना वाव मिळावा तसेच त्यांना मुख्य प्रवाहात आणणे यासाठी ठाणे महापालिका, दिव्यांग कला केंद्र राबवित असलेल्या उपक्रमाचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी कौतुक केले.व्यंगत्वावर मात करुन आपल्यात असलेले कलागुण रसिकांसमोर सादर करत दिव्यांग मुलांनी रसिकांची वाहवा मिळविली. यावेळी नृत्य,गायन, समूह गायन सादर अशा विविध कलाप्रकार सादर करताना मुलांमधील जिद्द आणि आत्मविश्वासाचा सुंदर अविष्कार पाहायला मिळाला.

सुरूवातीला ठाणे महानगरपालिकेच्या धर्मवीर आनंद दिघे जिद्द शाळेच्या विद्यार्थ्यांना प्रार्थना सादर केली. दिव्यांग कला केंद्राच्या विजय जोशी यांनी 'अथर्वशीर्ष' सादर केले. तसेच यंदाच्या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण होते ते म्हणजे संपूर्ण कार्यक्रम हा पर्यावरणावर आधारित 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी' या शीर्षकाखाली करण्यात आला. 'मी निसर्ग बोलतोय' या नाटिकेच्या माध्यमातून मुलांना पर्यावरणाचा संदेश दिला. यात दिव्यांग कला केंद्राचे संकेत भोसले, अपूर्वा दुगुळे, अन्मय मंत्री, अपर्णा महाबळे, जान्हवी कदम, कार्तिक रामाणे, गौरव राणे, रेश्मा जेठवा, आरती पाटे हे विद्यार्थी सहभागी झाले होते.

तद्नंतर पल्लवी पाटील हिने 'मोगरा फुलला', 'केतकीच्या बनी तिथे', 'श्रावणात घननिळा', श्रुतिका भोईर हिने 'नाच रे मोरा', ऋतुजा गांधी हिने 'बीज अंकुरे अंकरे', 'गारवा' आदी एकापेक्षा एक गाणी सादर केली. तर धर्मवीर आनंद दिघे जिद्द शाळेच्या विद्यार्थ्यांनी 'जा रे हट नटखट' या गाण्यावर नृत्य सादर केले. यात रुद्राक्षी पवार, अर्पिता चव्हाण, आशिषकुमारी शर्मा, श्रेया यादव, अथर्व ठोंबरे, साकेत झा, नानक वाळुंज, तेजस परब आदी विद्यार्थी सहभागी झाले होते. तसेच यावेळी छत्रपती शिवाजी महाराजे 'जन्मोत्सव ते राज्याभिषेक', लावणी, तबला वादन आदी विविध कार्यक्रम यावेळी सादर करण्यात आले. तसेच यावेळी ठाणे शहरात दिव्यांगासाठी काम करणाऱ्या विविध संस्थांना जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

# खंडणी विरोधी पथकाकडून लाखोंचे अंमली पदार्थ जप्त



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : पोलीस उपायुक्त ( गुन्हे ) अमरसिंग जाधव, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे )विनय घोरपडे, यांचे मार्गदर्शन खाली खंड आणि विरोधी पथक वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेश साळवी, सहायक पोलीस निरीक्षक सुनील तारामळे, सहा.पोलीस उपनिरीक्षक भोसले व सहकारी यांनी गोपनीय बातमीदाराकडून प्राप्त माहितीच्या आधारे श्री,गजानन रेसिडेन्सी, दिनकर विहार, को-ऑप, हौ, सोसायटी लिमिटेड, काका ढाबा, हाजी मलंग रोड, आडवली, ढोकाळी कल्याण पूर्व या ठिकाणी आकिब इकबाल बागवान हा एकूण 108 ग्रॅम 8 मिलीग्राम वजनाचा दहा लाख 88 हजार रुपये किमतीचा एम.डी. हा अंमली पदार्थ विक्री करण्याकरता जवळ बाळगला असताना व पन्नास हजार रुपये किमतीच्या गावठी बनावटीचे पिस्टल अग्निशास्त्र विनापरवाना बेकादेशीर रित्या जवळ बाळगून ठेवले असताना मिळून आला आहे. म्हणून आरोपी नामे आकिब इकबाल बागवान याचे विरुद्ध मानपाडा पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. सदर आरोपी हा सराईत गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले आहे.

अटक आरोपी याकडे चौकशी केली असा सदरचे अग्निशास्त्र त्याने भरत शत्रुघ्न यादव यांच्याकडून घेतल्याचे सांगितले. त्यामुळे गुन्ह्यातील भरत शत्रुघ्न यादव यांना सुद्धा ताब्यात घेतल्यानंतर एक जिवंत काडतुस मिळून आले आहे. सदर गुन्ह्याचे तपासामध्ये एकूण दोन आरोपींना आटक करण्यात आली असून त्यांच्याकडून 108.8 ग्रॅम वजनाचा एमडी ( मेफेड्रोन ) हा अमली पदार्थ व एक अग्निशास्त्र व एक जिवंत काडतूस असा एकूण 11 लाख 41 हजार रुपये किमतीचा माल जप्त करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास खंडणी विरोधी पथक ठाणे सहायक पोलीस निरीक्षक सुनील तारमळे करीत आहेत.

# भिवंडीत गोपाळकृष्ण मंदिरात गीता जयंती साजरी

## विद्यार्थ्यांसह महिलांचा उस्फूर्तपणे सहभाग




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : भिवंडी शहरातील बाजारपेठ येथील गीता परिवार व साप्ताहिक बाल संस्कार वर्गाने गोपाळकृष्ण मंदिरात गीता जयंती सोहळा आयोजित केला होता. या साठी विद्यार्थ्यांसह मोठ्या संख्येने महिला व नागरीक उपस्थित होते. योग आणि गीता या विषयावर आधारित साप्ताहिक बाल संस्कार वर्गाच्या उपक्रमाचे सादरीकरण सादर करण्यात आले. या वर्षी १५ मुले आणि १३ प्रौढांनी गीता परिवाराने लिहिलेल्या "गुंजन" या गाण्याचे १२ तसेच १५ अध्याय तोंडपाठ केले. त्यांना प्रमाणपत्रे आणि रोख बक्षिसे देण्यात आली. गीता जयंती सोहळयादरम्यान १२, १५ आणि १६ अध्यायांचे पठण करण्यात आले. वंदे मातरमच्या १५० वर्षांच्या पूर्तते निमित्ताने गीता परिवार,भिवंडी समितीने वंदे मातरम् गायले. कार्यक्रमाची सांगता गीता आरतीने झाली. या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते शीतल देशमुख विशेष पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

गीता परिवार यांनी साप्ताहिक बाल संस्कार वर्ग व "जागृती कलंत्री" सुरू करण्यात आले. जेथे गीता परिवार मुलांसाठी देवाची भक्ती, श्रीमद भागवत गीतेचे अध्याय, भारत मातेची उपासना, वैज्ञानिक दृष्टीकोन आणि गुरुदेव स्वामी विवेकानंदांनी दिलेली पाच तत्त्वे यावर कार्य करते. केंद्रावर प्रत्येक विशेष सणानिमित्त वेगवेगळ्या स्पर्धा घेतल्या जातात, मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी गीता परिवार केंद्र कार्यरत आहे. सचिन कलंत्री, जागृती कलंत्री, सुचेता थोरात, प्राची अग्रवाल, लीना राठी, स्नेहल बियाणी, सीमा जखेटीया, प्रमोद वडके, शैलेश परमार, महेंद्र माडकर, रामेश्वर काकाणी, पुष्पा प्रीति लाहोटी, रामेश्वर काकाणी, पुष्पा प्रीती लाहोटी यांच्या प्रयत्नामुळे गीता जयंती उत्सव २०२५ यशस्वी झाला.

# शिक्षक बदली धोरणात महिलांना प्राधान्य देण्याबाबत ग्रामविकास विभागासमवेत बैठक घेणार

## - शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

राज्यात जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षकांच्या बदल्यांमध्ये महिला शिक्षकांना प्राधान्य द्यावे, विशेषतः मुलींची संख्या अधिक असलेल्या शाळांमध्ये त्यांची नियुक्ती करावी, या संदर्भात ग्रामविकास विभागासोबत बैठक घेतली जाईल, असे शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी विधान परिषदेत लक्षवेधीच्या उत्तरात सांगितले.

सदस्य अरुण लाड यांनी विधान परिषदेत लक्षवेधीच्या माध्यमातून या विषयी उपस्थित केलेल्या चर्चेत सदस्य चित्रा वाघ, जयंत आसगावकर, ज.मो.अभ्यंकर, विक्रम काळे यांनी सहभाग घेतला.

राज्यमंत्री भोयर यांनी सांगितले, सध्याच्या बदली धोरणात महिलांसाठी वेगळे प्राधान्य नसून दुर्धर आजार, पती-पत्नी एकत्रीकरण, उमेदवारांची पसंती यांसारखे घटकच लागू आहेत. भविष्यात मुलींच्या संख्येनुसार महिला शिक्षकांना प्राधान्य देण्याचा विचार सकारात्मकपणे केला जाईल. मुलींच्या सुरक्षेसाठी पोक्सो समिती, युवा गट, तक्रार निवारण प्रणाली तसेच इतर उपाययोजना शाळांमध्ये राबवण्यात येत आहेत. ज्या शाळांमध्ये महिला समुपदेशक किंवा महिला शिक्षकांची कमतरता आहे, तिथे संबंधित विभागाशी चर्चा करून महिला समुपदेशकाची व्यवस्था करण्यावरही भर देण्यात येईल.राज्यमंत्री भोयर यांनी सांगितले, 2008 नंतर 100 टक्के अनुदानावर आलेल्या शाळांना वेतनेतर अनुदान देण्याबाबत वित्त विभागाशी चर्चा केली जाईल. तसेच 2008 पूर्वीच्या शाळांना मिळणारे वेतनेतर अनुदान वेळेवर देण्यासाठीही विभागाला आवश्यक निर्देश देण्यात येतील, असे त्यांनी या लक्षवेधीच्या उत्तरात सांगितले.

राज्यात समग्र शिक्षा अभियान, पीएमश्री शाळा व सीएमश्री शाळा उपक्रमांद्वारे मोठ्या प्रमाणात शाळांची बांधकामे सुरू आहेत. तसेच जिल्हा नियोजन समितीद्वारेही मोठा निधी उपलब्ध करून दिला जात असल्याचे त्यांनी सांगितले.

# ग्रामीण परिवर्तनासाठी बहुपक्षीय भागीदारीची दिशा

## कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांचे प्रतिपादन




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी मुंबई** : "नवोपक्रम, तंत्रज्ञान, उद्योगक्षेत्र आणि समुदाय यांच्या समन्वयातूनच ग्रामीण परिवर्तनाला गती देता येते," असे प्रतिपादन कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी यांनी केले.

आयआयटी बॉम्बे येथे नुकतेच स्वदेस फाउंडेशन, आयआयटी बॉम्बेच्या सेंटर फॉर टेक्नॉलॉजी अल्टरनेटिव्ह्ज फॉर रुरल एरियाज (CTARA) आणि ग्रीन एनर्जी अँड सस्टेनेबिलिटी (GESH) संशोधन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने 'विविध क्षेत्रांच्या भागीदारीद्वारे ग्रामीण परिवर्तन' या विषयावर उच्च-प्रभावी संवाद सत्र पार पडले. महाराष्ट्र शासनाच्या कोकण विभागीय आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमातून 'विकसित महाराष्ट्र' या शासनाच्या सामायिक दृष्टिकोनाचे प्रतिबिंब उमटले.

कार्यक्रमात 'क्रॉस-सेक्टर भागीदारीद्वारे ग्रामीण विकासाला गती' या विषयावर पॅनेल चर्चा घेण्यात आली. चर्चेत डॉ. विजय सुर्यवंशी यांच्यासह प्रा. बकुल राव (CTARA), श्री. रोनीट सेन (HSBC इंडिया), डॉ. प्रत्युष पांडा (CEO, वन स्टेज) आणि श्री. मंगेश वांगे (CEO, स्वदेस फाउंडेशन) यांनी सहभाग घेतला.

CTARA व GESH येथील प्राध्यापकांनी ग्रामीण भागातील हरित ऊर्जा, नवकल्पना आणि ग्रामीण प्रणालींमध्ये होत असलेल्या तांत्रिक प्रगतीविषयी माहिती सादर केली. त्यानंतर स्वदेस फाउंडेशनतर्फे समुदाय-आधारित परिवर्तनाच्या प्रेरणादायी उदाहरणांचे सादरीकरण करण्यात आले.

या सत्रात डॉ. माणिक दिवे (अतिरिक्त आयुक्त, कोकण विभाग), विविध CSR भागीदार संस्था, स्वदेस फाउंडेशनची टीम, आयआयटी बॉम्बेचे प्राध्यापक तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. उद्योगक्षेत्र, शिक्षणक्षेत्र, धोरणनिर्माते आणि तळागाळातील संस्थांमध्ये फलदायी संवाद घडला.

या संवादातून शासन, उद्योगक्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि समुदाय यांच्यातील सामूहिक कृतीची ताकद अधोरेखित झाली. विस्तारक्षम तंत्रज्ञान, डेटा-आधारित धोरणनिर्मिती, गरजांवर आधारित गुंतवणूक आणि प्रभावी अंमलबजावणी यांच्या साहाय्याने ग्रामीण महाराष्ट्राचा शाश्वत विकास वेगाने साध्य होऊ शकतो, असा संदेश या उपक्रमातून दृढ झाला. 2047 आणि त्यापुढील 'विकसित महाराष्ट्र'चे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी अशा बहुपक्षीय भागीदारी अनिवार्य असल्याचे मत या कार्यक्रमात नोंदविण्यात आले.

# बोरीवलीत कुत्रा चावल्यामुळे मुलाचा मृत्यू

## उपचारात डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे मुलाचा मृत्यू झाल्याचा पालकांचा आरोप



**दै.ठाणेजीवनदीपवार्ता**

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील पडघ्याजवळील बोरीवली गावात भटका कुत्रा चावल्यामुळे एका ५ वर्षाच्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

राहील रियाज शेख (५) रा. बोरीवली असे कुत्रा चावल्यामुळे मृत्यू झालेल्या मुलाचे नाव असुन त्याला २० नोव्हेंबर रोजी भटक्या कुत्र्याने चावा घेऊन गंभीर जखमी केले होते. त्याला उपचारासाठी पडघा प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले होते. तेथे उपलब्ध असलेल्या इंजेक्शन मार्फत मुलावर इलाज करण्यात आले होते मात्र जखम मोठी असल्याने तिसऱ्या टप्प्यातील अँण्टी रेबीज व्हॅक्सीन पडघा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपलब्ध नसल्याने मुलाला इंदिरा गांधी, सिव्हिल हॉस्पिटल येथे घेऊन जाण्यास सांगण्यात आले होते. त्यानंतर ९ डीसेंबर रोजी राहील शेख याला उलटी, ताप अशी लक्षणे असल्याने पडघा प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले ही लक्षणे रेबीजची असल्यामुळे डॉक्टरांनी त्याला सिव्हिल हॉस्पिटल येथे पाठवले होते तेथून त्याला मुंबईतील कस्तुरबा रुग्णालयात दाखल करण्यात आले होते तेथे त्याचा मृत्यू झाला. पडघा प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे मुलाचा मृत्यू झाल्याचा नातेवाईकांनी केला असुन संतप्त मृत मुलाचे वडील रियाज शेख ग्रामपंचायत सदस्य नसीर शेख, यूवा कार्यकर्ता जियाद गुजर, सह बोरीवली ग्रामस्थ, नातेवाईकांनी पडघा प्राथमिक आरोग्य केंद्रात धाव घेत याबाबत डॉक्टर प्रज्ञेश पाटील, निखील जोगळेकर यांना जाब विचारला. यावेळी उपस्थीत संतप्त बोरीवली ग्रामस्थांनी पडघा प्राथमिक आरोग्य केंद्रात मिळत असलेल्या असुविधांचा पाढा वाचला.तर तिसऱ्या टप्प्यातील अँण्टी रेबीज व्हॅक्सीन(इमीनो ग्लोबीलीन) प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर उपलब्ध होत नसल्याने राहील शेख यांस सिव्हिल हॉस्पिटल ठाणे येथे पाठवण्यात आल्याचे पडघा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रज्ञेश पाटील यांनी सांगितले. तर शहरातील भटकी कुत्री पडघा, बोरीवली येथे आणुन सोडत असल्याने भटक्या कुत्र्यांची संख्येत वाढ होऊन कुत्रा चावल्यामुळे निष्पाप नागरीकांचे बळी जात असल्याने स्थानीक प्रशासनाने ठोस उपाययोजना करण्याची मागणी नागरीकानी केली आहे.

# ठाणे जिल्हास्तरीय आंतरशालेय भव्य लेझीम स्पर्धेचे आयोजन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : आप्पासाहेब शिंदे क्रीडा प्रतिष्ठान या संस्थेच्या माध्यमातून मंगळवार १६ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ८ वाजता दादासाहेब गायकवाड क्रीडांगण, कल्याण पूर्व येथे ठाणे जिल्ह्यातील माध्यमिक विभागातील ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी आंतरशालेय भव्य लेझीम स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

क्रीडा क्षेत्राचे आधारस्तंभ व केमिस्ट हृदयसम्राट जगन्नाथ शिंदे यांच्या प्रेरणेने, ठाणे जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राचा विकास व्हावा, शालेय विद्यार्थ्यांना क्रीडा प्रगतीसाठी प्रोत्साहन मिळावे आणि २०३६ च्या ऑलिंपिक मध्ये ठाणे जिल्ह्यातून जास्तीत जास्त खेळाडूंनी भारताचे नेतृत्व करावे या उदात्त हेतूने अध्यक्ष विक्रांत शिंदे, कार्याध्यक्षा राजेश्वरी शिंदे, उपाध्यक्ष डॉ. कुलदीपक शिंदे, निलेश शिंदे, उद्योजक संतोष सावंत, सचिव अविनाश नलावडे, खजिनदार प्रताप पगार आणि अन्य नामवंत क्रीडा प्रेमींनी आप्पासाहेब शिंदे क्रीडा प्रतिष्ठान या संस्थेची स्थापना केली आहे.

लेझीम हा महाराष्ट्रातील मर्दानी तालबद्ध क्रीडा प्रकार असून शाळांमधील क्रीडा शिक्षक मोठ्या उत्साहाने विद्यार्थ्यांचे लेझीम पथक तयार करतात. या लेझीम स्पर्धेत दख्खनी, बडोदा, एशियाड या लेझीम प्रकारांप्रमाणे सांगली, कोल्हापूर व सोलापूर लेझीम प्रकारांचा समावेश असणारे सादरीकरण अपेक्षित आहे. ठाणे जिल्ह्यातील शाळांमधील क्रीडा शिक्षक व विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी, प्रथम, द्वितीय, तृतीय व उत्तेजनार्थ संघांना अनुक्रमे ७०००, ५०००, ३००० व १००० अशी भरघोस रोख पारितोषिके देण्यात येतील. सर्वोत्कृष्ट ध्वजधारक व वादकांना ५०० रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे.

या स्पर्धेत ज्या पथकातील लेझीम पटूंच्या माध्यमातून, सांघिक एकसूत्रीपणा व वैविध्यपूर्ण लेझीम प्रकार बसवणाऱ्या एका सर्वोत्कृष्ट लेझीम शिक्षकाचा विशेष गौरव करण्यात येणार आहे. ठाणे जिल्हास्तरीय आंतरशालेय लेझीम स्पर्धेचे संयोजक संजय काळे व स्पर्धा प्रमुख प्रविण खाडे असल्याची माहिती सचिव अविनाश नलावडे यांनी दिली.

# कल्याणमध्ये राष्ट्रवादीच्या वतीने निबंध व चित्रकला स्पर्धेचे आयोजन



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सर्वेसर्वा, माजी मुख्यमंत्री तथा माजी केंद्रीय मंत्री ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त कल्याण पश्चिम पॅनल क्र. 1, सापाड येथील कै. पार्वतीबाई पुंडलिक पाटील संचालित माध्यमिक विद्यालयात निबंध व चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. कल्याण पश्चिम विधानसभा कार्याध्यक्ष रुपेश थळे व वॉर्ड अध्यक्ष प्रेमनाथ मढवी यांच्या वतीने या निबंध आणि चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

या स्पर्धेला विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. परीक्षकांनी निवडलेल्या प्रथम ३ विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली तसेच सर्व सहभागी विद्यार्थ्यांना वही व पेन देऊन प्रोत्साहन देण्यात आले. या कार्यक्रमाला अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. यामध्ये जिल्हाध्यक्ष वंडार पाटील, युवक अध्यक्ष निखिल कदम, विधानसभा अध्यक्ष स्वप्निल रोकडे, कल्याण-डोंबिवली प्रवक्ते ओम सावंत, मुख्याध्यापक पानसरे तसेच विद्यालयातील अन्य शिक्षकवृंद उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या उत्साहवर्धनासाठी, सामाजिक बांधिलकी जपण्यासाठी आणि शैक्षणिक व सांस्कृतिक वातावरण अधिक सक्षम करण्यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

यावेळी मयूर सलपे, भानुदास घुगे, रविंद्र बिडलान, दिनेश मढवी, दयानंद पाटिल, आयोजक विधानसभा कार्याध्यक्ष कल्याण पश्चिम रूपेश थळे, वॉर्ड क्र.1अध्यक्ष प्रेमनाथ मढवी आदींची देखील उपस्थिती होती. तर शरद पवार यांचे कार्य बघून अनेक जण प्रेरणा घेत असतात. वयाच्या 86 व्या वर्षी देखील जोमाने काम करत आहेत. कृषी मंत्री असतांना त्यांनी शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले. देश स्वतंत्र झाला तेव्हा इंग्रजांच्या ताब्यातून आला मात्र आज तीच परिस्थिती निर्माण झाली असून देश अदानी अंबानी यांच्या ताब्यात जात आहे. बिहार मध्ये सत्तेचा वापर करून निवडणूक जिंकल्या तीच परिस्थिती इथे देखील होत असून आपले मत देखील योग्य विचार करून द्या असे आवाहन यावेळी जिल्हाध्यक्ष वंडार पाटील यांनी केले.

# भविष्यवेध



शुक्रवार
१२ डिसेंबर २०२५

**मेष**
तुमच्या कामांवर लक्ष केंद्रित करा आणि सकारात्मक राहा. इतरांवर जास्त अवलंबून राहू नका , तुमचं काम तुम्हीच करा. नाहीतर फसाल.

**वृषभ**
जीवन अधिक आरामदायी आणि सोपे वाटेल. कामात इतरांना मागे टाकण्याची तुमची इच्छा तुमचा आत्मविश्वास आणि कार्यक्षमता वाढवेल.

**मिथुन**
नवीन व्यवसाय सुरू करण्याचा किंवा वाढवण्याचा विचार करत असाल, तर आजचा दिवस खूप अनुकूल असेल. प्रॉपर्टी व्यवसाय फायदेशीर राहतील.

**कर्क**
समस्यांकडे सकारात्मकतेने पाहिले तर ते उपाय नक्की सापडेल, टेन्शन मिटेल. तुमच्यामध्ये होणाऱ्या सकारात्मक बदलांमुळे तुमचे कुटुंब खूश होईल.

**सिंह**
तरुणांनी निरुपयोगी कामांमध्ये आपला वेळ वाया घालवणे टाळावे. आरोग्य आणि मनोबल सुधारण्यासाठी देखील थोडा वेळ द्या, नाहीतर आळस घात करेल.

**कन्या**
जोडीदाराचा पाठिंबा आत्मविश्वास आणि आत्मविश्वास टिकवून ठेवेल. अनावश्यक गुंतागुंतींपासून मुक्त होऊन कामावर लक्ष केंद्रित करू शकाल.

**तुळ**
आत्मचिंतन तुमच्या दृष्टिकोनात सकारात्मक बदल घडवून आणेल. नातेवाईकासोबतचा तुमचा चालू वाद एखाद्याच्या मध्यस्थीने सोडवला जाईल.

**वृश्चिक**
तुमच्या ध्येयांवर लक्ष केंद्रित करा तरच यशस्वी व्हाल. तरुणांना अनुभवी आणि आदरणीय व्यक्तीचे आशीर्वाद आणि मार्गदर्शन मिळेल.

**धनु**
विद्यार्थी आणि तरुणांनी त्यांच्या यशाबद्दल शंका घेऊ नये. कोणतीही नवीन गुंतवणूक करण्यापूर्वी पूर्णपणे अभ्यास करा, मगच निर्णय घ्या. घाई नको.

**मकर**
इतरांकडून जास्त अपेक्षा करण्याऐवजी, स्वतःच्या क्षमतांवर विश्वास ठेवा आणि कामाला लागा. भावनेच्या भरात कोणताही महत्वाचा निर्णय घेणे टाळावे.

**कुंभ**
कामासाठी किंवा व्यवसायासाठी प्रवासा करावा लागू शकतो. तुम्ही खूप दिवसांपासून प्रयत्न करत असेले काम पूर्ण करण्यात यशस्वी व्हाल.

**मिन**
जवळच्या व्यक्तीचा सल्ला फायदेशीर ठरेल. ही पुढे जाण्याची वेळ आहे; जर तुम्ही योग्य दिशेने प्रयत्न केले तर तुम्हाला नक्कीच यश मिळेल.

# एमएलआयटी-जपान आणि ठाणे महानगरपालिका यांच्यात स्मार्ट सिटीसाठी करार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : जपानच्या मिनिस्ट्री ऑफ लँड, इन्फ्रास्ट्रक्चर अँण्ड ट्रान्सपोर्ट (MLIT) आणि ठाणे महानगरपालिका (TMC) यांच्यात माहिती तंत्रज्ञान व स्मार्ट सिटी नवोन्मेष या क्षेत्रातील सहकार्यासाठी अधिकृत करार (Moc)करण्यात आला. या करारामुळे ठाण्यातील डिजीटल गव्हर्नन्स, नागरिक सेवा अधिक प्रभावी करणे आणि स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चर विकासाला नवी गती मिळणार आहे.



जपानमध्ये पार पडलेल्या समारंभात जपानच्या मिनिस्ट्री ऑफ लँड, इन्फ्रास्ट्रक्चर अँण्ड ट्रान्सपोर्ट आणि ठाणे महानगरपालिका यांच्यातील सहकार्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आला. या समारंभास इन्फॉर्मेशन प्रोजेक्ट्चे (MLIT) डेप्युटी मिनिस्टर कावामुरा केनिच, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव उपस्थित होते.

हा कार्यक्रम ठाणे महानगरपालिका आयुक्त श्री. सौरव राव, आयएएस यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. TMC च्या डिजिटल परिवर्तन उपक्रमांना त्यांनी दिलेल्या धोरणात्मक दिशेमुळे हा करार अधिक बळकट झाला असून त्यांच्या सहभागामुळे आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धती स्वीकारण्याबाबत ठाणे महानगरपालिकेची कटिबद्धता प्रकर्षाने दिसून आली असल्याचे अधिकाऱ्यांनी नमूद केले.

या सहकार्य कराराअंतर्गत इन्फॉर्मेशन प्रोजेक्ट् (MLIT) आणि ठाणे महानगरपालिका (TMC) संयुक्तपणे स्मार्ट इन्फ्रास्ट्रक्चर, ICT प्रणाली विकास, क्षमता, वृद्धी, ज्ञान आदानप्रदान, तसेच ठाणे शहराच्या गरजांनुसार अत्याधुनिक डिजिटल उपायांची प्रायोगिक अंमलबजावणी हे उपक्रम राबविले जाणार आहेत. या भागीदारीमुळे नवोन्मेषी तंत्रज्ञानाचा जलद प्रसार होऊन ठाण्यात कार्यक्षम, लवचिक आणि नागरिक-केंद्रित शहरी प्रशासन प्रणाली विकसित होण्यास मदत होणार असल्याचे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले.

ठाणेच्या डिजिटल ट्रान्सफॉर्मेशनला गती देण्यासाठी राबविलेली धोरणात्मक दिशा आणि दृष्टीकोन या करारामध्येही ठळकपणे उमटल्या असून आंतरराष्ट्रीय सर्वोत्तम पद्धती आत्मसात करण्याबाबत ठाणे महापालिका कटिबद्ध असेल असे ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले. या स्वाक्षरी करारामुळे भारत–जपान सहकार्यातील नवे पर्व सुरू झाले असून आगामी काळात प्रभावी डिजिटल प्रकल्प व सामायिक तांत्रिक प्रगतीचा मार्ग अधिक दृढ होणार आहे.

या करारानुसार दोन्ही संस्थामध्ये ICT आधारित उपाययोजना, स्मार्ट शहरी व्यवस्थापन, तांत्रिक ज्ञान-विनिमय आणि नाविन्यपूर्ण प्रकल्पांची अंमलबजावणी करण्याबाबत सहकार्य केले जाणार आहे. हा पुढाकार ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या उपक्रमाच्या अंमलबजावणीत स्मार्ट सिटी ठाणेचे सीईओ संदीप माळवी, माहिती व तंत्रज्ञान विभागाचे उपायुक्त सचिन सांगळे, सल्लागार संस्था मेसर्स पलाडियम यांनी (Moc) सहकार्य कराराचा मसुदा तयार करणे व समन्वय साधणे यात महत्वपूर्ण योगदान दिले.

**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सुचना

ठाणे महानगरपालिकेच्या, प्र.क्र.१० अ राबोडी मध्ये मार्क्सनगर येथे जाणा-या रस्त्याचे यु.टी.डब्ल्यु.टी. पध्दतीने काँक्रीटीकरण करणे या एका कामाची ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकिय /निमशासकिय /सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम /स्थानिक स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्त भंगाचे कार्यवाहीच्या अनुषंगाने नोंदणी पत्र रद्द करण्याची कार्यवाही केली /सुरु आहे. अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना व निविदा प्रपत्र ठाणे महानगरपालिकेचे https://mahatenders.gov.in संकेत स्थळावर एका कामासाठी दि. १२/१२/२०२५ ते दि.१९/१२/२०२५ पर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा महानगरपालिकेचे संकेत स्थळावर दि.१९/१२/२०२५ रोजी सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा दि. १९/१२/२०२५ रोजी १७.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अथवा सर्व निविदा प्रपत्रके कारणे न दाखविता नाकारण्याचा अधिकार नगर अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-मु/१०२२/२०२५-२६ सही/-
दि:११.१२.२०२५ नगरअभियंता
Pls visit our oficial web-site ठाणे महानगरपालिका,ठाणे
www.thanecity.gov.in

**अनधिकृत बांधकामाला आळा घाला..**
**अनधिकृत बांधकाम दिसल्यास प्रभाग समितीत तक्रार करा !**

**अंबरनाथ नगरपरिषद**

**जाहीर आवाहन**

अंबरनाथ नगरपरिषद कार्यक्षेत्रात पशु जन्म नियंत्रण कार्यक्रम कायद्याची अंमलबजावणी सुरु असून त्यानुसार अंबरनाथ शहरातील भटक्या श्वानांची निर्बीजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण करणेकरीता छ. शिवाजी भाजी मार्केट, अंबरनाथ पश्चिम येथे श्वान नियंत्रण केंद्र कार्यरत आहे व भटक्या श्वानांच्या तक्रारी करीता Helpline No.9309876163 कार्यरत आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाची SUO MOTO WRIT PETITION (CIVIL) No.5 of 2025 अन्वये दि. २२/८/२०२५ व दि. ०७/११/२०२५ रोजीच्या आदेशान्वये स्थानिक स्वराज्य संस्था यांनी निवडलेल्या ठिकाणी व ठरावीक वेळेत श्वानांना खाऊ घालणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने अंबरनाथ नगरपरिषद कार्यक्षेत्रातील सर्व नागरीकांना सूचित करण्यात येत आहे की, नगरपालिकेने ठरवून दिलेल्या Feeding Spot वर ठराविक वेळेत भटक्या श्वानांना खाऊ घालणे बंधनकारक आहे. तरी ज्यांना भटक्या श्वानांना सार्वजनिक ठिकाणी खाऊ घालावयाचा आहे, त्यांनी नगरपालिकेकडे Feeding Spot करीता अर्ज करणे बंधनकारक आहे. अर्जाचा नमुना नगरपरिषद कार्यालयात शहर सफाई विभागांत उपलब्ध आहे. अंबरनाथ नगरपरिषदेच्या परवानगी नंतरच ठरवुन दिलेल्या ठिकाणी व ठरावीक वेळेत भटक्या श्वानांना खाऊ घालण्यात यावे जेणेकरुन इतर नागरिकांना याचा त्रास होणार नाही. तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाचे व प्राणी कल्याण मंडळाचे मार्गदर्शक सुचना व नियमांचे काटेकोरपणे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(उमाकांत गायकवाड)**
**मुख्याधिकारी**
**अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ**

**जा.क्र. अंनप/आरोग्य विभाग / २०२५-२६/३३६**
**दि. ११/१२/२०२५**

# 'गाणं म्हणजे त्रिगुणात्मक सृष्टी'

## - ज्येष्ठ कवी अशोक बागवे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे:** कतीचे शब्द है कागदावर मृत असतात, संगीतकार त्याला अमृत पाजतात आणि हे शब्दसूर मंथनातून कसे बाहेर आले ते गायक आपल्या गळ्यातून सांगतात. त्यामुळे गाणं म्हणजे ही एक प्रकारची त्रिगुणात्मक सृष्टी आहे, असे उद्गार ज्येष्ठ कवी अशोक बागवे यांनी काढले.

रोटरी क्लब ऑफ ठाणे नॉर्थ आणि संवेदना प्रकाशन यांच्या वतीने ज्येष्ठ कवी विकास भावे यांच्या ओठावरली गाणी या दुसऱ्या पुस्तकाचे प्रकाशन बागवे यांच्या हस्ते रोटरी हॉल येथे झाले.



यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून ज्येष्ठ गायिका मधुवंती दांडेकर उपस्थित होत्या. तसेच व्यासपीठावर संवेदना प्रकाशनचे नितीन हिरवे, रोटरी संस्थेचे माजी अध्यक्ष जितेंद्र भांबुर्डे, अनघाचे अमोल नाले, कवी, चित्रकार रामदास खरे उपस्थित होते.

तृप्ती भावे आणि सहकाऱ्यांनी पुस्तकातील काही भावगीते सादर केली. लेखक भावे यांनी आपल्या मनोगतातून या पुस्तक निर्मितीमागची भूमिका मांडली, तर मधुवंती दांडेकर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे निवेदन डॉ. प्रतीक्षा बोर्डे यांनी केले. कती विकास भावे यांनी आभार मानले.

# शिवसेना मदत कक्ष आयोजित एकदिवसीय महाआरोग्य शिबीर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली :** जिल्हा परिषद शाळा माणगाव, (मानपाडा) कल्याण शीळ रोड,येथे शिवसेना मदत कक्ष आयोजित मोफत एकदिवसीय महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

गुलाब वझे ज्येष्ठ नेते, अध्यक्ष आगरी महोत्सव, आणि दत्ता वझे माजी सरपंच, यांच्या अध्यक्षतेखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.




या शिबिरात, नेत्रचिकित्सा, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, एन्जोप्लास्टी, इंजॉग्रफी हाडांचे विकार, जनरल तपासणी, इसीजी, स्त्रीरोग, बालरोग, तपासणी आणि उपचार आणि सर्व तपासण्या आणि मोफत औषधोपचार सेवेचे आयोजन करण्यात आले होते. या योजनेचा लाभ मानपाडा, उंबरली, संदप, कोळेगाव, घरीवली, येथील ग्रामस्थांनी या मोफत आरोग्य शिबिराचा लाभ घेतला आणि आयोजकांना मनापासून धन्यवाद दिले .या महाआरोग्य शिबिराला भेट देण्यासाठी आणि निरीक्षणासाठी शिवसेना मध्यवर्ती शाखा डोंबिवली येथून अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# योग्य निर्णय घेतल्यास व्यसनाची साखळी तुटू शकते - डॉ. अर्चना पवार

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : तरुणाईला तंबाखूच्या विळख्यातून दूर ठेवण्यासाठी जिल्हा आरोग्य विभागाने प्रभावी मोहिमेची सुरुवात केली. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय मौखिक आरोग्य कार्यक्रम आणि जिल्हा सामान्य रुग्णालय (सिव्हिल) यांच्या संयुक्त विद्यमाने गांधी नगर येथील नवजीवन प्राथमिक विद्या मंदिर, चेकनाका येथील माजगाव रात्र शाळेत तंबाखूविरोधी जनजागृती उपक्रम मोठ्या उत्साहात राबविण्यात आला. योग्य निर्णय घेतल्यास व्यसनाची साखळी तुटू शकते, असा सल्ला जिल्हा दंत शल्य चिकित्सक डॉ. अर्चना पवार यांनी दिला.

या उपक्रमात विद्यार्थ्यांना तंबाखूचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, व्यसनाचे घातक चक्र आणि तरुण वयात निसटता पायपोस कसा लागू शकतो याबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली. सुरुवातीलाच तंबाखूविरोधी माहितीपटाचे प्रात्यक्षिक दाखवून जागरूकता निर्माण करण्यात आली. कार्यक्रमात डॉ. पवार यांनी विद्यार्थी व पालकांशी थेट संवाद साधत तंबाखूमुळे होणारे दातांचे नुकसान, तोंडाच्या कॅन्सरची भीषण अवस्था आणि श्वसनासंबंधी आजारांचे वास्तव चित्र उभे केले.

महाराष्ट्र शासन

**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड यांचे कार्यालय तालुका-मुरबाड जिल्हा - ठाणे**

कार्यालयाचा पत्ताः एम.आय.डी.सी. प्लॉट क्र.१४ ता. मुरबाड जि.ठाणे पिन कोडः ४२१४०१
दूरध्वनी क्र. ०२५२४-२२२१९९ ई-मेलः tahmurbad1@gmail.com

**जाहिर नोटीस**

**प्रति,**
**१) श्री/श्रीम.- मुमताज बाबु शेख**
**रा. कुडशेत ता. मुरबाड जि. ठाणे ............................(अर्जदार)**
**विरुद्ध**
**२) ग्रामपंचायत कुडशेत**
**जन्म मृत्यु नोंदणी विभाग,**
**ता. मुरबाड, जि. ठाणे ........................................सामनेवाले**

तमाम जनतेस सदर नोटीसीद्वारे सुचीत करण्यात येते आहे ते येणेप्रमाणेः

१. उपरोक्त अर्जदार यांचे पती कै. बाबु सिलामन शेख यांचा मृत्यु दि. ०८/०६/१९९७ रोजी राहत्या घरी मु. कुडशेत ता. मुरबाड, जि. ठाणे येथे झालेला आहे. अर्जदाराकडून काही अपरिहार्य कारणांमुळे तसेच अनावधनामुळे सदर जन्म/ मृत्युची नोंद निबंधक, जन्म, मृत्यु नोंदणी विभाग, ता. मुरबाड, जि. ठाणे दप्तरी करुन जन्म / मृत्युचा दाखला प्राप्त करुन घ्यावयाचा राहिला होता. अर्जदार यांना त्यांच्या काही वैयक्तिक कारणांसाठी मृत्यु दाखल्याची आवश्यकता आहे.
२. उशीरा मृत्युची नोंदणी दाखला मिळणेसाठी मा. तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचेकडून आदेश प्राप्त करून घ्यावयाचा असल्यामुळे सदर कार्यालयास किरकोळ अर्ज क्र. दाखल केला आहे.
३. सदर बाबत कोणत्याही व्यक्तीची कोणताही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत सदर न्यायालयात दाखल करावी वरील मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखल केल्यास अर्जदार यांना सदर कार्यालयातर्फे यांचे पती यांचा मृत्युच्या नोंदणीचा दाखला मिळणे करीता आदेश करण्यात येईल.

आज दिनांक माहे ११/१२/२०२५ रोजी माझे सहीने व शिक्क्याने दिली.

शिक्का

**जा. क्र.फौजदारी/जन्म मृत्यू नोंद /कावि -९७३/२०२५**

**हुकमावरुन**
**सही /-**
**(श्रीम. सुषमा अव्हाड- बांगर)**
**निवासी नायब तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, मुरबाड**

## शिवसेना उपशहर प्रमुख मोहन उगले यांच्या वतीने

# कौटुंबिक स्नेह मेळावा



### जो कुटुंब प्रमुख सुख दुखः वाटून घेण्याचं काम करतो त्यालाच कौटुंबिक स्नेह मेळावा घेण्याचा अधिकार - शिवसेना जिल्हा प्रमुख अरविंद मोरे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : शिवसेनेचा कौटुंबिक मेळावा आहे. हा कौटुंबिक मेळावा म्हणजे, तुमच्या आमच्या संवाद घडले पाहिजेत तुमच्या आमच्यात चर्चा घडल्या पाहिजेत. तुमच्यातले सुखः आणि दुखः वाटून घेण्याचं काम केलं पाहिजे. हे काम सातत्याने जो कुटुंब प्रमुख करतो त्यालाच कौटुंबिक स्नेह मेळावा घेण्याचा अधिकार असून to अधिकार मोहन उगले यांना असल्याचे मत शिवसेना जिल्हा प्रमुख अरविंद मोरे यांनी व्यक्त केले. शिवसेना ठाणकर पाडा विभागीय शाखेच्या वतीने पॅनल क्रमांक सात येथील कार्यकर्त्यांसाठी माजी नगरसेवक तथा उपशहरप्रमुख मोहन उगले व महिला शहर संघटक नेत्रा उगले यांच्या पुढाकाराने शिवसेना कौटुंबिक स्नेह मेळाव्याचे आयोजन कल्याण मधील लक्ष्मी मंगल कार्यलय याठिकाणी करण्यात आले होते, यावेळी मोरे बोलत होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून कायैक्रमाची सुरूवात करण्यात आली. यावेळी जिल्हा प्रमुख अरविंद मोरे, जिल्हा संघटक छाया वाघमारे, माजी महापौर वैजयंती घोलप, शहरप्रमुख रवि पाटील, उपशहप्रमुख व माजी नगरसेवक मोहन उगले, महिला शहर संघटक नेत्रा उगले, उपशहप्रमुख कल्पना जमदाडे, विभाग प्रमुख अनंता पगार, शाखा प्रमुख नितीन कदम, गणेश कुंभारकर, ज्योती पाटील, सुनिता मोरे आदींसह शिवसैनिक, महिला आघाडी, युवा सैनिक व मोठ्या संख्येने लाडक्या बहिणी उपस्थित होत्या.

दिल्ली मध्ये नरेंद्र मोदी यांचा चेहरा बघून म्हणजे सबका साथ सबका विकास हे बघून सत्ता आली, तर महाराष्ट्रात शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांचा चेहरा बघून महायुतीची सत्ता आली आहे हे भाजप नेत्यांनी विसरु नये असे बोल जिल्हा प्रमुख अरविंद मोरे यांनी सुनावले. केंद्रात व राज्यात युती आहे त्या प्रमाणे महापालिका मध्ये युती झाली पाहिजे अशी आमची हि इच्छा आहे. परंतु शिवसेनेचे मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे जो पर्यंत युती बाबत काही निर्णय घेत नाही तोपर्यंत आम्ही आमच्या पद्धतीने काम करणार असल्याचे मोरे यांनी सांगितले.

तर आपल्या सोबत असलेली हि महिला शक्ती आपली एनर्जी असून युवासेनेची यंग ब्रिगेड आपले टोनिक आहे. तर नागरिकांना आमिष देणारे भरपूर आहेत, मात्र मोहन उगले हा २४ तास प्रभागात उपलब्ध असून कुणी कितीही करोडपती आले तर त्यांना हा एक रोडपती भारी असल्याचे मोहन उगले यांनी सांगितले.

# दिल्ली शंखनाद महोत्सवात 'शौर्य' व 'श्रद्धा' यांचा अद्भुत संगम

## मंगल पांडेंची बंदूक, पानीपत युद्धातील तोफ प्रथमच दिल्लीत...

*** दुर्मिळ सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे दिव्य अंश आणि रामसेतूची दिव्य रामशिळा यांचे दर्शन!**



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी दिल्ली** : भारताच्या इतिहासातील 'भक्ती' आणि 'शक्ति' यांचा संगम घडवणारा एक अद्वितीय सोहळा देशाच्या राजधानी दिल्लीमध्ये साकारत आहे. 'सेव्ह कल्चर, सेव्ह भारत फाउंडेशन' प्रस्तुत आणि 'सनातन संस्था' आयोजित 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' दिनांक १३ ते १५ डिसेंबर, भारत मंडपम्, नवी दिल्ली येथे होत आहे. या भव्य महोत्सवात १८५७ च्या पहिल्या बंडातील आद्यक्रांतीकारी मंगल पांडे यांनी वापरलेली बंदूक आणि मध्य प्रदेशच्या राजघराण्यातील मल्हारराव होळकर, तसेच क्रांतीसिंह नाना पाटील यांनी वापरलेल्या बंदूका प्रथमच दिल्लीकरांसमोर येणार आहेत. पानीपतच्या युद्धातील तोफा यांसह १५०० दुर्मिळ शस्त्रे पाहायला मिळणार आहेत. या महोत्सवात पराक्रमाचा तेजस्वी इतिहास आणि चैतन्यदायी अध्यात्माचा अद्भुत संयोग अनुभवायला मिळणार आहे, अशी माहिती सनातन संस्थेचे प्रवक्ते श्री. अभय वर्तक यांनी दिली.

'स्वराज्याचा शौर्यनाद' : शिवकालीन शस्त्रांचे दुर्मिळ प्रदर्शन :

या महोत्सवातील 'स्वराज्याचा शौर्यनाद' प्रदर्शनीत छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील १५०० हून अधिक ऐतिहासिक शस्त्रांचा भव्य संग्रह प्रथमच दिल्लीकरांसमोर उलगडणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वतः स्पर्श करून सरसेनापती हंबीरराव मोहिते यांना दिलेली तलवार, ढाळ, दांडपट्टा, कट्यार, बंदूक, २ तोफा; बालक आणि स्त्रिया यांच्या रक्षणासाठीची शस्त्रे यांचाही समावेश आहे. तसेच महाराणा प्रताप आणि विजयनगर साम्राज्यकालीन शस्त्रेही येथे पहाता येतील. हे केवळ शस्त्रांचे प्रदर्शन नसून लहान मुलांना यातून प्रेरणा मिळावी, म्हणून काही शस्त्रे हाताळण्यासाठी दिली जाणार आहेत, हे या प्रदर्शाचे वैशिष्ट्य आहे. तसेच तोफ कशी उडवली जाते, याचे प्रात्याक्षिक दाखवले जाणार आहे. हे शस्त्रप्रदर्शन 'हॉल क्रमांक १२' मध्ये सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत सर्वांसाठी खुले राहील.

१ सहस्र वर्षांनंतर सोमनाथ ज्योतिर्लिंगाचे दिव्य दर्शन !

या महोत्सवात १ सहस्र वर्षांहून अधिक काळ जपलेल्या मूळ सोमनाथ ज्योतिर्लिंगाच्या अवशेषांचे दर्शन प्रथमच सर्वांसाठी उपलब्ध होणार आहे. गझनीच्या महंमदाने उद्ध्वस्त केलेल्या हे पवित्र अवशेष पुजारी कुटुंबाने तमिळनाडूत सुरक्षित ठेवले असून, कांची कामकोटी पीठाचे शंकराचार्य यांच्या मार्गदर्शनाने सनातन संस्थेमार्फत प्रदर्शित होणार आहेत. तसेच प्रभू श्रीरामांनी बांधलेल्या रामसेतूच्या अवशेषांपैकी रामशिळा (पाण्यावर तरंगणारे दगड) हे देखील येथे दर्शनासाठी ठेवण्यात येणार आहे.

'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'च्या माध्यमातून राष्ट्ररक्षण, संस्कृती, शौर्य व हिंदवी स्वराज्याचे तेज चेतविण्याचा प्रयत्न आहे. हे प्रदर्शन पहाण्यासाठी लहान मुलांसह युवापिढीला पालकांना अवश्य घेऊन यावे, असे आवाहन सनातन संस्थेने केले आहे. हा महोत्सव SanatanRashtraShankhnad.in या संकेतस्थळावर लाइव्ह पहाता येईल.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
**सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा** मुंबई विद्यापीठाशी संलग्न

**ADMISSION OPEN 2025-26**


**११ वी व १२ वी**
ARTS, COMMERCE, SCIENCE

UNDER GRADUATE: B.A. | B.Com. | B.Sc. CHEMISTRY | B.Sc. MATHS | BAF | BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. HISTORY

Look forward to a BRIGHTER FUTURE

7038658191
9130580111

# भूतान येथील जलतरण स्पर्धेत कल्याणच्या निता बोरसे यांना सुवर्णपदक




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : निता बोरसे एक गृहिणी असून विविध खेळांची आवड त्यांना असल्याने नुकत्याच भूतान खेळ फेडरेशन मार्फत आयोजित भूतानची राजधानी टीम्पू येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत संयुक्त भारत खेळ फेडरेशन तर्फे भारताचे प्रतिनिधित्व निता बोरसे यांनी केले. निता बोरसे यांना जलतरण स्पर्धेत विविध अंतरात तीन सुवर्ण व एक रोप्य पदक मिळाले.

निता बोरसे यांनी आपले घर सांभाळत सततचा जलतरण सराव करून विविध पाच देशात खेळून आल्या व त्यांनी पदके ही मिळवली. बिर्ला कॉलेजचे फिजिकल डायरेक्टर यज्ञेश्वर बागराव यांचे बोरसे यांना मार्गदर्शन लाभले. बिर्ला रात्र महाविद्यालयाचे प्राचार्य दुबे यांनी निता बोरसेचं अभिनंदन करून पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या. भूतान येथे झालेल्या जलतरण स्पर्धेत खूप अडचणीचा सामना करावा लागला. तिथे मोठ्या प्रमाणात थंडी होती चार डिग्री सेल्सिअस तापमान होते. परंतु जिंकण्याची जिद्द होती म्हणूनच मला हे यश मिळवता आले असल्याची प्रतिक्रिया निता बोरसे यांनी दिली.

# भिवंडी महापालिका निवडणुकीसाठी शिवसेनेची आढावा बैठक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : आगामी होणाऱ्या भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूका शिवसेना भाजप महायुतीच्या माध्यमातून लढविण्यासाठी शिवसेना पक्ष सज्ज असुन पक्षातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी निवडणुकीच्या कामकाजाला लागावे आपल्या प्रभागातील मतदारांशी संपर्क साधून मतदार याद्यांची व दुबार नावांची तपासणी करावी यंदा भिवंडी महापालिकेवर महायुतीचा भगवा फडकविण्यासाठी सुसज्ज रहावे असे आवाहन शिवसेनेचे उपनेते माजी आमदार रूपेश म्हात्रे व ठाणे जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांनी केले.

भिवंडीत आगामी होणाऱ्या महानगरपालिकेच्या निवडणुका लक्षात घेऊन काँग्रेस,समाजवादी पक्ष व शिवसेनेने निवडणूक लढविण्याच्या दृष्टिकोनातून तयारी सुरू केली आहे.इच्छुक उमेदवारांना काँग्रेस व समाजवादी पक्षाकडून




अर्ज वाटप करण्याचे काम सुरू झाले आहे. त्यामुळे शिवसेनेचे पक्षप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार पक्षाच्यावतीने पद्मानगर येथील वेंदात सभागृहात शिवसेना पक्षाचे उपनेते रुपेश म्हात्रे व शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत पदाधिकाऱ्यांची निवडणूक संदर्भात विशेष आढावा बैठक काल बुधवारी सायंकाळी आयोजित करण्यात आली होती.

## महायुतीचा भगवा फडकविण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन

यावेळी शिवसेनेचे माजी उपमहापौर मनोज काटेकर, नगरसेवक बाळाराम चौधरी,संजय म्हात्रे,दिलीप गुळवी,शहरप्रमुख संजय काबुकर,श्याम पाटील, मारुती धिरडे अदि महिला व पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापालिकेची सार्वत्रिक निवडणुक ही महायुतीच्या माध्यमातून लढविण्यासाठी आम्ही विशेष प्रयत्न करीत आहोत.मात्र पक्षप्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार महापालिकेच्या 90 वार्डात उमेदवार उभे करण्यासाठी चाचपणी सुरू केली आहे.इच्छुक उमेदवार व पदाधिकाऱ्यांनी आपल्या प्रभागात नागरी समस्या कामकाजाचा आढावा घेऊन कामाला सुरुवात करावी,मतदारांशी संवाद साधून त्यांना भेडसावणाऱ्या समस्या चे निराकरण करावे तसेच मतदार याद्यांची तपासणी करून दुबार नावा संदर्भात हरकती घ्याव्यात असे आवाहन यावेळी शिवसेना उपनेते रुपेश म्हात्रे यांनी केले. निवडणूक जिंकण्यासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी मतदारांशी संपर्क करून कामाला लागावे.निवडणूक महायुतीच्या माध्यमातून लढविण्याचा अंतिम निर्णय पक्षप्रमुख एकनाथ शिंदे हे घेणार असले तरी आपण सर्व जागा लढविण्याची तयारी करत असल्याची माहिती शिवसेनेचे जिल्हाप्रमुख देवानंद थळे यांनी दिली. भिवंडी महापालिकेवर यंदा महायुतीचा भगवा झेंडा फडकवा असे आवाहन शिवसेनेचे ठाणे जिल्हाप्रमुख थळे यांनी केले आहे.

यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्याकडून प्रत्येक वार्ड व प्रभागां विषयी माहिती घेण्यात आली. निवडणुका लढविण्यासाठी शिवसेनेने तयारी सुरू केली असुन होणाऱ्या निवडणुका या महायुतीच्या माध्यमातूनच लढविल्या जाव्यात अशी अपेक्षा जिल्हाप्रमुख थळे यांनी व्यक्त केली आहे. पक्षाच्या कार्यकर्तेनी आपापल्या प्रभागातील नवतरूण व महिला मतदारांसोबत संवाद साधून कामाला सुरुवात करावी. असे आवाहन करण्यात आले.

# शाळा बंद आंदोलनाच्या दिवसाचा पगार कपात होणार नाही

## - आ.ज्ञानेश्वर म्हात्रे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : शिक्षकांच्या विविध मागण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील संस्था, मुख्याध्यापक, शिक्षक -शिक्षकेतर संघटनांनी दिनांक 5 डिसेंबर 2025 रोजी शाळा बंद आंदोलन केले होते. यावर शिक्षण संचालक यांनी शाळा बंद करून आंदोलनात सहभागी होणाऱ्या शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा एक दिवसाचा पगार कपात करण्याचे आदेश काढले होते. शिक्षकांनी स्वतःचे न्याय हक्कासाठी केलेल्या लढ्याला न्याय मिळावा म्हणून आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी दि.11 डिसेंबर 2025 रोजी हिवाळी अधिवेशनामध्ये विधिमंडळात सदरचा प्रश्न उपस्थित करून पगार कपात करू नये अशी मागणी केली.

तसेच शाळा बंद असलेल्या दिवसाला आम्ही सुट्टीच्या दिवशी कामकाज भरून काढू व विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ देणार नाही. त्यामुळे पगार कपात करू नये अशी विनंती केली. त्यानुसार शालेय शिक्षण विभागाचे राज्यमंत्री पंकज भोयर यांनी पगार कपातीचा आदेश रद्द केला जाईल असे उत्तर दिले. त्यामुळे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना दिलासा मिळाला आहे असे महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटना कोकण विभाग अध्यक्ष प्रशांत भामरे यांनी सांगितले.

# डोंबिवलीतील टिळक रस्त्याचे सिमेंट काँक्रिटिकरण लवकरच सुरू होणार



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : गेल्या अनेक महिन्यांपासून डोंबिवलीतील टिळक रोडचे काँक्रिटीकरण विविध तांत्रिक अडचणींमुळे रखडलेले आहे, विविध शासकीय यंत्रणा त्यावर काम चालू आहे. अमृत योजने अंतर्गत भूमिगत गटार योजनेचे काम, पाणी पुरवठा मुख्य जलवाहिनी इत्यादी कामांमुळे हा रस्ता अनेक दिवस रखडलेला असून या रस्त्यावर दुरुस्ती कामे करण्यास मानव निर्मित अडचणी निर्माण झाल्या होत्या. बुधवारी पुन्हा एकदा खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांना या अडचणी बाबत सांगितले असता त्यांनी कल्याण डोंबिवली महानगरपालिका शहर अभियंता अनिता परदेशी यांच्याशी चर्चा केली व त्या नुसार आज या रस्त्याच्या कामाचा व त्यातील अडचणी समजून घेण्यासाठी एकत्रित पाहणी दौरा पार पडला. लवकरच या रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम सुरू होणार आहे.

तर उर्वरित अर्धा रस्ता लवकरात लवकर वाहतुकीसाठी डागडुजी करून देण्याबाबत परदेशी यांनी संबंधितांना आदेशित करण्यात आले. ज्यांच्या मुळे या कामास विलंब झाला त्यांना नोटीस देण्यात येणार आहे. या पाहणी दौऱ्यात केडीएमसी अधिकारी, एमएमआरडीए अधिकारी त्यावर काम करणाऱ्या यंत्रणा, वाहतूक पोलिस अधिकरी श्रीराम पाटील आणि शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, युवासेना शहर प्रमुख सागर जेधे, संजय निकते हे उपस्थित होते.

# चंडिकाईदेवी माध्यमिक विद्यामंदिरात विज्ञान प्रदर्शन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : हिराजी पाटील एज्युकेशन सोसायटी पेण या संस्थेचे श्री.चंडीकाईदेवी माध्यमिक विद्यामंदिर आराव या प्रशालेत १० डिसेंबर रोजी शालेय स्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे खजिनदार रमेश नथुराम तांडेल यांनी भूषविले. या कार्यक्रमास उपाध्यक्ष लीलानाथ धर्मा पाटील, प्रसाद गजानन म्हात्रे (प्रशासक ग्रुप ग्रामपंचायत आराव ), सौ. सुचिता दिनेश शेलार (माजी सरपंच आराव ),



मनेश शिवाजी भोसले (स्थानिक स्कूल कमिटी अध्यक्ष ), दत्तात्रेय कोठेकर (केंद्रप्रमुख गागोदे बुद्रुक ), उल्हास भगवान नागावकर (मुख्याध्यापक रा.जि.प. आराव ), रा.जी.प.आराव शिक्षक वृंद, सौ. तृप्ती पुगावकर (ग्रामसेविका आराव ), सौ. चंद्रभागा कृष्णा भोसले (अंगणवाडी सेविका ), हिराजी पाटील एज्युकेशन सोसायटी पेण या संस्थेतील सर्व सन्माननीय मुख्याध्यापक आणि विज्ञान शिक्षक , पालक , ग्रामस्थ, आजी-माजी विद्यार्थी, उपस्थित होते.

प्रथमतः सरस्वती मातेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. ईशस्तवन ,स्वागत गीतांनी पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. प्रशालेचे मुख्याध्यापक जितेंद्र जयवंत पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत करून कार्यक्रमाचे प्रस्ताविक सादर केले. त्यानंतर मान्यवरांचे मनोगत झाले. पहिल्या सत्रामध्ये मान्यवरांचे आभार मानण्यात आले . सर्व परीक्षकांनी विज्ञान प्रतिकृती आणि रांगोळीचे परीक्षण केले. दुसऱ्या सत्रामध्ये निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व स्पर्धांचे निकाल जाहीर करण्यात आले आभार प्रदर्शन करून वंदेमातरम या राष्ट्रगीताने कार्यक्रमाचे सांगता करण्यात आली . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी हिराजी पाटील एज्युकेशन सोसायटीचे सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.

# झाडावर अडकलेल्या मांजराची ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांकडून सुटका

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : वसंत विहार येथील लोकपुरम गेट क्रमांक दोनजवळील झाडावर अडकलेल्या मांजराची ठाणे महापालिका आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांनी सुटका केली. ही घटना बुधवारी पहाटे १ वाजता घडली, या घटनेत अडकलेल्या मांजराला दुखापत झाली नाही. परिसरातील काही रहिवाशांनी मांजर अडकल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाला दिल्याने त्याचे प्राण वाचू शकले.

# संदेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त नेत्रचिकित्सा आणि मोफत चष्मे वाटप




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता /डोंबिवली** : श्री संदेश हरिश्चंद्र पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त डोंबिवली पश्चिमेकडील प्रभाग क्रमांक 22 येथील शिवसेना शाखेमध्ये आणि विकास म्हात्रे यांच्या शिवसेना कार्यालयात मोफत नेत्रचिकित्सा आणि मोफत चष्मे वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

संदेश हरिश्चंद्र पाटील हे वर्षभर नेहमीच प्रभाग क्रमांक 22 मध्ये लोक उपयोगी कार्यक्रम करीत असतात आणि आज तर त्यांचा वाढदिवस आहे या निमित्ताने प्रभागातील आणि डोंबिवली शहरातील अनेक लोक त्यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी येत आहेत याच निमित्ताने संदेश पाटील यांनी या वाढदिवसा निमित्ताने आरोग्य शिबिरात आहेआयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिराचा लाभ देवीचा पाडा, गरिबाचा वाडा, कुंभार खान पाडा, राजीव, नगर उमेश नगर येथील अनेक नागरिकांनी लाभ घेतला.दरम्यान संदेश हरिश्चंद्र पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी त्यांचे नातेवाईक, मित्रमंडळी, आणि सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय क्षेत्रातील अनेक हितचिंतकांनी त्यांना शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन अनेक शुभ आशीर्वाद दिले.

# अंबाडीनाका येथे संगम हॉस्पिटलचा लोकार्पण सोहळा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**झिडके-अंबाडी:** भिवंडी तालुक्यातील अंबाडीनाका येथे "संगम मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचा" लोकार्पण सोहळा नुकताच संपन्न झाला. या प्रसंगी उद्धाटक- विवेकभाऊ पंडीत,संस्थापक-अध्यक्ष श्रमजीवी संघटना,अध्यक्ष-आढावा समिती महाराष्ट्र राज्य.त्यांनी उद्घाटन सोहळयानिमित्ताने आपले शुभेच्छापर मनोगत व्यक्त करताना म्हटले की,अंबाडी सारख्या ग्रामीण भागात इतक्या सर्व सोईसुविधाने सुसज्ज असणा-या हॉस्पिटलची उभारणी करणारे सामाजिक कार्यकर्ते माझे मित्र मधुकर पाटील यांना अगदी मनापासून मी शुभेच्छा देत आहे.परंतु त्याचबरोबर येथील सर्वसामान्य रहिवाशांना चांगल्या प्रकारे आणि माफक स्वरूपात उपचार कसे मिळतील याकडेही लक्ष दिले पाहिजेत. यावेळेस त्यांनी आपले काही खाजगी हॉस्पिटलचे बरेवाईट



अनुभव कथन करताना आजकाल काही हॉस्पिटल मध्ये रुग्णांची कशी लुटमार होते यासंदर्भात काही प्रसंग सांगितले,त्यावेळेस उपस्थित जनसमुदाय अवाक झाले,परंतु वस्तुस्थिती सत्य असल्याचे जनसमुदायाने मान्यही केले.

" संगम मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल" चे डॉ.गौतम व डॉ.दामिनी पाटील यांनी आपल्या हॉस्पिटलचे लोकार्पण करताना,उपस्थित जनसमुदायाला संभोतित केले की,आम्ही आमच्या हॉस्पिटलमधून गोरगरीब व सर्वसामान्यांबाबत विविध स्वरूपाच्या सोईसुविधा आणि अनेक शासकीय योजनांचा जास्तीत-जास्त लाभ देण्याचा प्रयत्न करणार आहोत की, जेणेकरून "संगम हॉस्पिटल" बद्दल जनमानसात विश्वास आणि आपुलकी निर्माण होईल. या हॉस्पिटल मधून विविध आजारांवर तज्ञ डॉक्टरांकडून उपचार केले जातील,त्यामुळेच येथील रुग्णांना यापुढे ठाणे,मुंबई या शहरांच्या ठिकाणी असणाऱ्या हॉस्पिटल मध्ये जाण्याची गरज भासणार नाहीत,असा आशावाद व्यक्त केला.

"संगम मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलच्या" लोकार्पण सोहळयानिमित्त प्रमुख अतिथी म्हणून, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे युरॉलॉजिस्ट डॉ. देवेंद्र पाटील, ज्येष्ठ पत्रकार-शरद पाटील,समाजसेवक-रामचरण- (रामूकाका) नाईक के.डी.पाटील सर आदिंची उपस्थिती होती.सदर कार्यक्रमात अंबाडी परिसरातील सुप्रसिद्ध बालरोगतज्ज्ञ डॉ.अविनाश पाटील यांचा विवेकभाऊ पंडीत यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. सदर कार्यक्रम पत्रकार शरद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कार्यक्रमाचे उत्तम प्रास्ताविक त्याचबरोबर सूत्रसंचालन भगवान पाटील गुरूजी यांनी केले.

एकंदरीत अंबाडीनाका येथे प्रथमच एक सुसज्ज हॉस्पिटल सुरू होत असल्याचा आनंद परिसरातील नागरिकांना होत असतानाच या हॉस्पिटल लोकार्पण सोहळयानिमित्ताने विविध क्षेत्रातील जनसमुदाय उपस्थित राहून आयोजक डॉक्टर दांपत्यास मंगलमय शुभेच्छा व्यक्त केल्या.

# सिद्धेश्वर एक्सप्रेसमधून कोटींच्या दागिन्यांची चोरी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण**: सिद्धेश्वर एक्सप्रेसमधील साडेपाच कोटी रुपयांच्या दागिन्यांची चोरी करणारे सहा चोरटे सीसीटीव्हीत कैद झाले आहेत. चोरट्यांच्या तोंडावर मास्क असल्याने त्यांची ओळख पटविण्याचे काम पोलिसांकडून सुरू आहे. पोलिसांनी एकाला ताब्यात घेतले आहे. रेल्वे पोलिस तपास करीत आहे.मुंबईत गोरेगाव येथे राहणारे अभयकुमार जैन त्यांची मुलगी तनिष्का हिच्यासोबत सोलापूरला गेले. त्यांच्याजवळ कोट्यवधी रुपयांचे दागिने होते. दागिने घेऊन ते सोलापूरला गेले. काही दागिने विकले. उर्वरित दागिने घेऊन ते सिद्धेश्वर एक्सप्रेसने मुंबईला परत येत होते. सोलापूर ते कल्याण रेल्वे स्थानकादरम्यान त्यांची साडेपाच कोटी रुपये किंमतीच्या दागिन्यांनी भरलेली बॅग चोरट्यांनी लंपास केली. .

# प्राथमिक आरोग्य केंद्र खालापूर येथे क्षयरुग्णांना पोषक आहाराचे वाटप

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**रायगड** : रिलायन्स हॉस्पिटल, लोढवली प्राथमिक आरोग्य केंद्र चौक ता.खालापूर यांच्या द्वारे निक्षय मित्र रिलायन्स कंपनी लि.पातळगंगा यांच्याकडून 50 क्षयरुग्णांना पोषक आहार फूड बास्केट (दि.8 डिसेंबर 2025) रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र खालापूर येथे मान्यवरचा हस्ते वाटप करण्यात आले.

यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. इंगोले कल्याणी, रिलायन्स हॉस्पिटलचे डॉ.प्रणा बारडोई रिलायन्सचे डेयपुटी जनरल मॅनेजर विनोद तारेकर, मिलन लॅबोरेटीज इंडिया, प्रा. लि. चे सुलभा झेंडे. निखिल अवसरे, शहर क्षयरोग अधिकारी डॉ. उषा राठोड, डॉ.अक्षयराज राठोड, डॉ.वैभवी निंबाळकर, डॉ. देशमुख डॉ. शहा, श्रीमती तारा बनसोडे कौंसलेर रिलायन्स हॉस्पिटल, महेंद्र पिंगळे आदि मान्यवर होते.

यावेळी टी. बी. मुक्त रायगड करण्यासाठी सर्व कॉर्पोरेट क्षेत्रातील कंपन्यानी या कार्यात योगदान द्यावे. जास्तीत जास्त कंपन्यांनी निक्षय मित्र बनावे, असे आवाहन जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. प्राची नेहूलकर यांनी केले आहे. यावेळी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. प्राची नेहूलकर यांचा हस्ते कार्यक्रमाचे दीप प्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमास उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे आभार समाधान धनवे यांनी मानले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र वावरे, लोहप, चौक, येथील आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

# लोकल रेल्वेसेवांमध्ये गर्दुल्ल्यांकडून अमली पदार्थाचे सेवन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** मध्य रेल्वे मार्गावरील लोकल रेल्वे सेवांमध्ये दिवसाढवळ्या गर्दुल्यांकडून सेवन केले जात असते. मात्र रेल्वे पोलिसांच्या बेजबाबदारपणामुळे अशा नशेखोरांना आला घालता येत नाही असे संतप्त प्रवाश्यांचे म्हणणे आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार कल्याण रेल्वे स्थानकातून अप मार्गावर आणि डाऊन मार्गावर प्रवास करणाऱ्या लोकल रेल्वे सेवांमध्ये खुलेआम नशेखोर अमली पदार्थचे सेवन करत असल्याचे धक्कादायक प्रकार सहजच घड असतात. अलीकडेच कल्याण रेल्वे स्थानकावरील घटना माध्यमांद्वारे समोर आली आहे. दुपारी 3 वाजून 12 मिनिटांच्या सुमारास




कल्याण रेल्वे स्थानकातून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस प्रवास करणाऱ्या लोकल सेवेच्या माल डब्यामध्ये माथेफिरू तरुणाने अमली पदार्थाचे सेवन खुशालपणे सगळ्या प्रवाशांसमोर काही प्रवाशांनी त्याला रोखण्याचा प्रयत्न केले असता.माथेफिरू तरुणाने इतर प्रवाश्यांना उलट उत्तरे देत दमदाटी केली. त्याचप्रमाणे 9 डिसेंबर, रोजी एका नशेखोराला कल्याणहून बदलापूर रेल्वे स्थानकात प्रवास करत असलेल्या लोकल रेल्वे सेवेमध्ये इतर प्रवाश्यांद्वारे चांगलाच चोप देण्यात आला.

प्रवाश्यांच्या म्हणण्यानुसार असे नशेखोर रात्रीच्या काळात लोकलमध्ये नशे करून इतर प्रवाशांना धमकावत असतात. व मध्य रेल्वे मार्गावरील रेल्वे पोलिसांच्या डोळेझाक वृत्तीमुळे गर्दुल्ले खुलेआम लोकल रेल्वे सेवांमध्ये अपराध करत असतात. मात्र रात्रीच्या वेळेमध्ये लोकल रेल्वे सेवांमध्ये रेल्वे पोलीस नियुक्त नसल्यामुळे अशा नशे खोरांना अपराध करण्यास वाव भेटत असते असे संताप प्रवाशांचे म्हणणे आहे.

मुंबई उपनगरीय मध्य रेल्वे मार्गावरील लोकल सेवांमध्ये एन गर्दीचे काळ बाजूला सारून. इतर वेळी रेल्वे पोलीस म्हणजेच लोहमार्ग पोलीस अथवा रेल्वे सुरक्षा बल लोकल रेल्वे सेवांमध्ये तैनात कारवाई अशी प्रवाशांची मागणी आहे. मात्र मध्य रेल्वे प्रशासनाने या मागणीकडे लक्ष्य देत तातडीने प्रत्येक लोकल रेल्वे सेवांमध्ये रेल्वे पोलीस तैनात करून लोकल सेवांमध्ये होणाऱ्या अपराधांवर आळा घालावे असे प्रवाशांचे म्हणणे आहे.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024